# बेद्रेपाड्यात शेतकऱ्याकडे घरफोडी; रोकडसह १६ तोळ्यांचे दागिने लंपास

**■ धुळे । प्रतिनिधी**

तालुक्यातील बेंद्रेपाडा चोरट्याने शेतकऱ्याकडे घरफोडी करील २० हजारांची रोकड व १६५ ग्रॅमचे सोन्याचे दागिने लंपास केले. त्याची एकुण किंमत १ लाख ३ हजार इतकी आहे. दरम्यान बाजारभावानुसार विचार केल्यास या दागिन्यांची किंमत १५ लाखावर आहे. चोरीप्रकरणी तालुका पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत शेतकरी मच्छिंद्र पंडीत पाटील (वय ४६ बेंद्रेपाडा (ता. धुळे) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, दि.२६ एप्रिलच्या रात्री ११ ते २७ एप्रिलच्या पहाटे ५ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने घराच्या उत्तरेकडील खिडकीच्या लोखंडी गजाला वाकवून आत प्रवेश केला. घरातील कपाटातून सोन्याचा ४० ग्रॅम वजनाचा पोहेहार, ४० ग्रॅमची मंगलपोत, ३० ग्रॅमची गोफ व पोत, २० ग्रॅमची चैन, १० ग्रॅमचे झुंबे, १० ग्रॅमचे कानातील टोंगल, ८ ग्रॅमचे झुमके, ३ ग्रॅमच्या कानातील रिंगा, २ ग्रॅमची बाळी व ३ ग्रॅमचे कानातील फॅन्सी टॉप व २० हजारांची रोकड असा एकुण १ लाख ३ हजाराचा ऐवज चोरून नेला. या घटनेमुळे गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक धनवटे करत आहेत.

# पोलीस अधिकाऱ्याची बदनामी; तरुणास अटक

**■ धुळे । प्रतिनिधी**

सोशल मीडियावर पोलिस अधिकाऱ्याविरोधात अपशब्द वापरत बदनामी करणारा व्हिडीओ पोस्ट केल्याप्रकरणी शहरातील पद्मनाभ नगरातील विशाल साळुंखे याच्याविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे

याबाबत धुळे शहर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक गणेश तुळशिराम पवार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते दि. ४ एप्रिल रोजी विशाल शालीक साळुंखे (वय ३३ रा. पद्मनाभ नगर, साक्री रोड, धुळे) याच्या घरी गेले असतांना, त्याने त्याच्या मोबाईलमधून काढलेली व्हिडीओ शूटींग त्याच्या दोन इन्स्टाग्राम खात्यावरून पोस्ट केला.

या व्हिडीओमध्ये लाचखोर पोलिस अधिकारी व शिवीगाळ करण्यात आली आहे. या कृत्यामुळे पोलिस दलाची प्रतिमा मलीन होत असून, लोकांच्या मनात पोलिसांविरोधात चुकीची भावना निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे विशाल साळुंखेविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५१(४), २९६ सह पोलिस (अप्रतिची भावना चेतवणे) अधिनियम १९२२ चे कलम ३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दीपक पाटील हे करीत आहेत.

# एकाला दोघांची मारहाण

**■ नंदुरबार । प्रतिनिधी**

मुलगा अपघातात कसा मरण पावला असे विचारल्याच्या कारणातून एकाला मारहाण केल्याची घटना नळवा खुर्द येथे घडली. याप्रकरणी दोन जणांविरूध्द उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नंदुरबार तालुक्यातील नळवा खुर्द येथील धानू लक्ष्मण राठोड याची पत्नी उषाबाई राठोड ही संशयीतांच्या घरी जावूनर माझा मुलगा हा अपघातात कसा मरण पावला असे विचारले याचा राग आल्याने संश्यीतांनी शिवीगाळ केली. त्याबाबत जाब विचारण्यास गेलेल्या थानू लक्ष्मण राठोउ यांना दोघांनी लाकडी दांडयाने मारहाण करीत जखमी केले. याबाबत धानू राठोड यांनी नंदुरबार उपनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार विनोद जयराम राठोड, अरूण मनोज राठोड या दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास हे.कॉ. पौलाद भिल करीत आहेत.

# महान कर्मयोगी - मानवमित्र - खान्देशरत्न - सहकार महर्षी -स्व. काकाजी कांतीलालजी जैन



या उक्तीला सार्थ ठरविणारं व्यक्तिमत्व म्हणजे - हस्ती परिवाराचे आधारस्तंभ, हस्ती बँकेचे सर्वेसर्वा, हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट व हस्ती पब्लिक स्कूलचे प्रणेते आणि जैन सकल संघाचे अध्यक्ष आदरणीय काकाजी कांतीलालजी जैन, यांचा आज दि. २ मे रोजी चौथा स्मृतिदिवस कांतीलालजी जैन हे सहकार व बँकींग क्षेत्रात ' काकाजी 'या नावाने सुप्रसिद्ध होते. शिस्तप्रियता, पारदर्शकता, सचोटी व माणसं ओळखण्याची कला या चरित्र गुणांच्या बळावर काकाजींचा किर्तीचा सुगंध सर्वदूर पसरला.

काकाजींचा जन्म १८/१०/१९४६ रोजी शहादा येथे झाला. त्यांनी आपल्या बुद्धीमत्तेच्या बळावर पुणे येथील फरग्युसन कॉलेजला प्रवेश मिळविला व एफ. वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. काकाजींचे वडील स्व. हस्तीमलजी जैन यांनी कुटुंबासह दोंडाईचा येथे स्थलांतर केले. दोंडाईचा येथे आल्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीत हस्तीमलजींनी आडद दुकान सुरू केले. सोबतच कापड दुकानाचाही व्यवसाय सुरू ठेवला. यात अनेक वेळा चढ-उतार आले. तरी देखील येणाऱ्या संकटांचा यशस्वीपणे सामना करत व्यापार-व्यवसाय सुरू ठेवला.

व्यापारासह सामाजिक, धार्मिक कार्यासाठी प्रसिद्ध राहिलेले स्व. हस्तीमलजी भोमराजजी जैन यांनी सन १९७१ च्या सुमारास अनंत अडचणी असतांना आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन सचोटी, प्रामाणिकपणा आणि पारदर्शी कारभार या त्रिसुत्रीच्या भक्कम पायावर हस्ती बँकेची मुहूर्तमेढ रोवली. आणि प्रस्थापितांच्या आर्थिक गुलामगिरीतून मुक्त होण्याचा काळ दोंडाईचात सुरू झाला!

बँक स्थापनेपासून प्रचंड विरोधाला खंबीरपणे सामोरे जाऊन; तब्बल १० वर्ष बँकेच्या नेतृत्वाची धुरा सांभाळत बँकेचा पाया मजबूत केला. आणि १९८७ च्या सुमारास स्वत:हून बँकेच्या नेतृत्वाची धुरा आपले द्वितीय सुपुत्र कांतीलालजींकडे सोपविली.

कांतीलालजी जैन या बँकेचे ३५ वर्ष संचालक व त्यातील २५ वर्ष बिनविरोध चेअरमन होते. याकाळात त्यांनी बँक व्यवहारात काळानुरूप अमुलाग्र बदल केले. त्यांच्या अथक परिश्रम व चिकाटीमुळे बँकेच्या छोट्याशा रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतस झाले आहे. आजमितीस संपूर्ण महाराष्ट्रात बँकेच्या २१ संगणकीकृत शाखांचे जाळे विस्तारले आहे. त्यांच्या अनमोल मार्गदर्शक विचारांनुसार बँकेने आर्थिक प्रगतीची वाटचाल अविरतपणे सुरू ठेवली आहे.

हे सारं काही शक्य झालं आहे, ते फक्त आदरणीय काकाजींमुळेच ! म्हणूनच ' हस्ती बँक म्हणजे काकाजी व काकाजी म्हणजे हस्ती बँक ' हे समीकरणच होऊन गेले !

स्व. काकाजींच्या मनात सदैव कर्मचाऱ्यांचे हित व कल्याण साधण्यासाठी चांगल्या योजनांचा विचार असायचा. त्यांच्या समवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी कायम मित्रांसारखी वागणूक दिली. कर्मचारी व त्यांच्या परिवाराची काकाजी कायम काळजी करायचे. प्रत्येकाला ते आपुलकीने व आस्थेने ' कसं चाललयं ? ' विचारायचे. हा आपल्यातला गुण विशेष त्यांनी कायम जोपासला.

के.एस. परिवाराचा दाल मिल व जळगाव, शहादा, नंदुरबार व दोडाईचा येथे कोल्ड स्टोरेजचाही व्सवसाय आहे.

स्व. कांतीलाल जैन व स्व. शांतीलाल जैन यांनी व्यवसाय करता-करता समाजाशी आपली नाळ जोडलेली होती. विशेषत: या बंधू द्वयांच्या प्रत्येक कृतीतून, आचरणातून व विचारातून प्रकर्षाने जाणवायचे की, समाजालाही फायदा मिळाला पाहिजे. समाजाचे कल्याण साधले जाण्यासाठी काही-ना-काही सातत्याने केलं गेलं पाहिजे. आपल्या पुढच्या पिढीलाही त्यांनी हिच शिकवण दिली. आपण जे काही कमवतो, त्या उत्पन्नाचा काही भाग समाजाकरिता दान व्हायला पाहिजे. या विचारांचा वारसा त्यांची सर्व मुले यशस्वीरित्या पुढे नेत आहेत. ७२ वर्षाचं कर्मयोगी व समाधानी आयुष्य लाभलेल्या काकाजींनी एक वर्षापूर्वी दि. २ मे २०१८ बुधवार रोजी संथारा व्रत घेऊन पंडित मरण प्राप्त केले. स्व. काकाजी कांतीलालजी जैन या मानवतावादी पूजारींनी आपल्या सहधर्मचारिणी चंद्रावतीजी जैन यांच्या सहयोगाने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात सेवा केली. त्यांचे संपूर्ण जीवन तुम्हा-आम्हासाठी आदर्श वस्तूपाठ घालणारे होते !

स्व. काकाजी कांतीलालजी जैन यांच्या सातव्या स्मृतिदिवस निमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली !

# श्री जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये उद्या मेगा कॅम्पस ड्राइव्ह

**■ दोंडाईचा । प्रतिनिधी**

येथील श्री जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे दि.२ मे रोजी सकाळी ९ वाजता मेगा कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामध्ये पाचपेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून, अभियांत्रिकीच्या विविध शाखांतील विद्यार्थ्यांसाठी ही एक उत्कृष्ट संधी ठरणार आहे.या कॅम्पस ड्राइव्हमध्ये फ्लायनॉट सास प्रा. लि., रॅबिट ॲण्ड टॉरटॉईज, वोक्सवॅगन, रेमंड, स्कोडा, लेग्रँड, हिटाची आणि बजाज ऑटो यासारख्या आघाडीच्या कंपन्यांचा सहभाग निश्चित झाला आहे. राज्याचे मंत्री जयकुमार रावल, सरकारसाहेब रावल, सी. एन. राजपूत, विकास अधिकारी आर.टी.गिरासे, प्राचार्य डॉ.डी. एम. पटेल, उपप्राचार्य व ट्रेनिंग आणि प्लेसमेंट अधिकारी बी.डी. गिरासे तंत्रनिकेतनचे प्राचार्य एम.डी. पाटील यांनी जास्तीत जास्त उमेदवारांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## पान १ वरुन ...

### हा सामाजिक गुन्हाच!

त्याच आशयाचे सुविचार फलक लावले जातात. त्या अर्थाच्या प्रार्थना आणि श्लोकही शिकवले जातात. मोठ्या वयात ही समज कुठे हरवते? अन्न कचऱ्यात फेकून देताना काहीच वाटत नसावे का? उरलेले अन्न बऱ्याचदा कचऱ्यात किंवा जमिनीवर फेकले जाते. ते तिथेच कुजते. त्यातून घातक वायू बाहेर पडतात. ते मानवी आरोग्यासाठी त्रासदायक ठरतात. माती आणि हवेचे एक प्रकारचे प्रदूषणच आहे. या पार्श्वभूमीवर अन्न वाया घालवणे हा सामाजिक गुन्हा मानला जायला हवा. सार्वजनिक समारंभात उरलेले अन्न वाया जाऊ नये यासाठी अनेक सामाजिक संस्था पुढाकार घेतात. भुकेले लोक आणि उरलेले अन्न यांच्यात दुवा सांधणारे उपक्रम राबवतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने ॲप तयार करतात. यात वेगळे प्रयोगही अनुभवास येतात. जिथे जेवलेले ताट ठेवले जाते, तिथे स्वयंसेवक उभे करतात. ताटात अन्न उरले असेल तर त्या व्यक्तीला ते खायला सांगितले जाते. स्वच्छ केल्याशिवाय ताट ठेवू दिले जात नाही. अन्न आणि बरोबरीने नैसर्गिक संसाधने वाया जाऊ नयेत यासाठीच ही सगळी यातायात किंवा प्रयोग राबवले जातात. लोकांनी त्यामागील उद्देश लक्षात घेण्याची गरज आहे. अन्न वाया न घालवण्याचे सामाजिक भान प्रत्येकाने राखायलाच हवे.

### जातीनिहाय जनगणना!

आरक्षणावरून विविध जातिसमूहांनी सुरू केलेल्या तीव्र आंदोलनामुळे जातिनिहाय जनगणनेची मागणीही पुढे आली होती. तसेच काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातिनिहाय जनगणनेसाठी आक्रमक भूमिका घेतली होती. अशी जनगणना झाल्यानंतर ओबीसींसह समाजातील इतर मागास घटकांना न्याय मिळेल, असा विश्वास ते व्यक्त करत होते. तसेच कोणत्याही परिस्थितीत देशात जातिनिहाय जनगणना करवून घेऊ, असे आव्हान त्यांनी सरकारला दिले होते.

### भारत २४ तासांत हल्ला करणार!

बळी ठरला आहे आणि या परिस्थितीची त्यांना जाणीव आहे. आम्ही नेहमीच जगातील सर्व पातळीवर आणि प्रकटीकरणांतून त्याचा निषेध केला आहे, असे तरार यांनी म्हटले आहे. याआधी पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी दावा केला होता की, भारत कधीही हल्ला करु शकतो. यामुळे पाकिस्तान हाय अलर्टवर आहे. पाकिस्तान पूर्णतः सतर्क आहे आणि जर आमच्या जीवाला थेट धोका असेल तरच आम्ही अण्वस्त्रांचा वापर करू, अशी दर्पोक्ती आसिफ यांनी व्यक्त केली होती.

## निधन वार्ता

### रमेशचंद्र अहिरराव



**निजामपूर । वार्ताहर ।** निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी रमेशचंद्र नामदेव अहिरराव यांचे दि.३०.बुधवार रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दि.१ मे रोजी राहत्या घरून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुली, मुलगा, नातवडे, जावाई असा परिवार आहे.

### आनंदा कापडणीस



**धुळे । प्रतिनिधी ।** फागणे ता. धुळे येथील रहिवासी आनंदा शंकर कापडणीस (वय ८८ ) यांचे दि. ३० एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुन, नातू पंतू, जवाई असा परिवार आहे. ते दिपक आनंद कापडणीस यांचे वडील तर चेतन दीपक कापडणीस यांचे आजोबा होत.

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ७८९ ४९ ५६८ | १२५ ८९ ४६९ | ३६९ ८३ १५७ | १५६ २९ १८० | ● | १३० ४४ ७८९ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ५५८ ८२ ७७८ | २४४ ०१ २९० | ५७९ १४ ३४७ | १२० ३३ ७८८ | १६० ७० ६७७ | ८८० ६६ २७७ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १११ ३३ १३९ | ६७७ ०० ३३४ | ४७० १० ५५० | ८९० ७९ २८९ | २५७ ३४ १५५ | २३४ ९६ ५५६ |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | १२८ १२ ३३६ | ४६० ०४ ३५६ | ८८० ६६ ३६७ | १७८ ६१ ५६० | १६९ ६२ १३८ | २३५ ०२ ६७९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | १८० ९१ ५८८ | २४७ ३६ २६८ | ७८९ ४४ २३९ | २७७ ६३ ६७० | ३४५ २३ २३८ | ४६९ ९३ ६८९ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | २५७ ४० ३८९ | २७० ९६ २६८ | १६९ ६२ ५७० | ५५८ ८० २२६ | ४८९ १५ १६८ | ३५९ ७६ २४० |
| २१-०४-२०२५ २६-०४-२०२५ | २४७ ३५ ५०० | ४६९ ९१ ३३५ | १४९ ४४ २४८ | २९९ ०८ ४५९ | ४९० ३४ ७८९ | २५७ ४६ २६८ |
| २८-०४-२०२५ ०३-०५-२०२५ | ७८९ ४३ २५६ | १२८ १४ १६७ | ३४५ २५ १६८ | | | |

## मिलन डे

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि | रवि |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | २३९ ४४ २४८ | ६७८ १३ १४८ | ३४५ २९ १४४ | ७७० ४२ २५५ | ● | १४९ ४७ २७८ | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १२० ३६ ११४ | ५७९ १२ ५८९ | ३८८ ९५ १७७ | १३८ २८ ४७७ | ३५९ ७९ १२६ | ५८८ १३ ६७० | ● |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १३८ २८ २६० | ७८८ ३७ २५० | ३४६ ३८ १७० | १६० ७१ ३८० | १४८ ३४ ३५६ | १४५ ०३ ६७० | ● |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | ४५५ ४५ १५९ | ६७० ३६ ३६७ | २३६ १९ ४६९ | ६८८ २६ ४४८ | ८८९ ५४ ३५६ | १२० ३४ ५९० | ● |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | ३६६ ५१ २९० | २४७ ३१ ११९ | १५० ६१ ४८९ | १४९ ४० ४७९ | ४४६ ४२ ११० | १६९ ६६ ११४ | ● |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | ६६७ ९७ ३७७ | १८० ९२ २४६ | ३४७ ४४ १५८ | १५७ ३८ ४५९ | ४५० ९१ १३७ | ५५७ ७२ ५८९ | ● |
| २१-०४-२०२५ २६-०४-२०२५ | २०० २६ ८९९ | ५९० ४१ २४५ | १२८ १७ २७८ | २३७ २० ५७८ | १३४ ८५ २३० | २८९ ९० १३६ | ● |
| २८-०४-२०२५ ०३-०५-२०२५ | २३८ ३३ ३४६ | १७० ८६ २४० | ४४४ २५ १६८ | | | | ● |

## मिलन नाईट

| सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|
| ४६७ ७८ ४५९ | ४५८ ७८ ४७७ | ३७९ ९३ ३४६ | ३४९ ६९ ३७९ | ● | ४९० ३१ १४६ |
| ४६७ ७७ २६९ | ११३ ५१ ३८० | ५५८ ८२ १५६ | ४४० ८९ २७० | ४५६ ५५ ४५६ | १२५ ८५ १६८ |
| २९९ ०२ ३४५ | १९९ ९० ३७० | ११२ ४६ ३४९ | १३८ २१ ५६० | ३४५ २३ १३९ | ११६ ८८ ३५० |
| २४७ ३७ १७९ | ६९० ५१ १३७ | ३३७ ३३ २४७ | १२० ३७ ४४९ | २०० २३ २४७ | २६० ८४ २३९ |
| २८० ०९ २३४ | ८८० ६५ ६९० | ४५७ ६१ ३८० | १२९ २५ ६९० | ८८० ६४ १५८ | ५९० ४५ १७७ |
| ३६९ ८० ३३४ | ५६८ ९३ १५७ | १६० ७६ २६८ | १७० ८७ १६० | २४४ ०७ १६० | २४० ६२ ५७० |
| १४५ ०५ १६८ | २४६ २८ १८९ | ६८० ४४ १६७ | १५६ २७ १६० | २३५ ०५ ६९० | १२६ ९४ १४९ |
| २३९ ४५ १७७ | २८० ०५ ७८० | | | | |

जाहिरात छोटी किमया मोठी

## नशिबाची परीक्षा

गुरुवार ०१/०५/२०२५

*** मिलन डे ***

१७९ २७८ ३७७ **७-६** १५० २४० ६०० | सिंगल ७-३-५

जोड ७०-४६-३१-५२-६९

*** कल्याण बाजार ***

१४५ २३५ ५५० **०-३** १२० ६७० ३०० | सिंगल ०-२-९

जोड ०७-१३-२६-८९-३४

*** मुंबई (मेन) बाजार ***

१५६ १२९ ११० **२-४** १३० १४९ ११२ | सिंगल २-५-७

जोड २०-८४-५१-७९-४३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६

## केळी भाव

नवती (१) : 1950

नवती (२) : 1750

## मिश्कीली




**मंगळवार २९/०४/२०२५**

मेन बाजार -१२४-७६-१५०

मिलन ना.-२८०-०५-७८०

**बुधवार ३०/०४/२०२५**

मेन बाजार -

कल्याण-३४५-२५-१६८

मिलन डे -४४४-२५-१६८

मिलन ना.-

जाहिरात छोटी किमया मोठी

# क्लासिफाईड

## पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

## खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाडयाने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

## दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इजंक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

## १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www. drpalve nashamuk tikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

## उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

## देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. 'देशदूत'च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. 'देशदूत', 'देशदूत कार्यालय' राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

### सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची 'देशदूत' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'देशदूत' वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.